# क्षयरोगग्रस्त रुग्ण महिलेवर यशस्वी हृदय शस्त्रक्रिया

**मुंबई :** हृदय शस्त्रक्रिया ही अत्यंत गुंतागुंतीची प्रक्रिया असते. मात्र, तरीही क्षयरोगाची लागण झालेल्या महिलेच्या हृदयाजवळील गाठ शस्त्रक्रियेद्वारे काढून संबंधित महिलेला जीवदान देण्यास 'नानावटी सुपर स्पेशालिटी' रुग्णालयातील डॉक्टरांना यश मिळाले आहे. विलेपार्ले येथे राहणाऱ्या मिनल टवटे (५१) या महिलेला वर्षभरापूर्वी क्षयाची लागण झाली होती. या आजारावर मात करण्यासाठी त्यांच्यावर औषधोपचार सुरू होते. पण काही केल्या त्यांचा त्रास कमी होत नव्हता. विविध खासगी व पालिका रुग्णालयात यावर उपचारही करण्यात आले होते. मात्र, काहीच फरक पडला नाही.